ePaper
‘येत्या 36 तासांमध्ये पाकिस्तानसोबत युद्धाला सुरुवात’, भगरे गुरुजींचं भाकीत
वर्ष - 8 । अंक - 272 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- गुजरातविजयासह हैदराबादचं पॅकअप!
- श्रीसंत सॅमसनमुळे अडचणीत सापडला
- जातगणनेवरून केंद्राला घेरणार!
- लष्करी कारवाईची पाकिस्तानला भीती!


www.mahaenews.com | शनिवार, दि. 3 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### अरबी समुद्रात भारताचा युद्धाभ्यास सुरु

# पाकिस्तानची भंबेरी, पाच टार्गेट्स निश्चित!

## अमित शाह गरजले, “चुन चुन के मारेंगे !” : जीव वाचवण्यासाठी पाकड्यांची पळापळ सुरु!

। नवी दिल्ली / इस्लामाबाद
। प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारतीय आरमाराने पाकिस्तानच्या दिशेने अरबी समुद्रात मुसंडी मारली असून युद्धाभ्यासाला सुरुवात केली असल्यामुळे पाकिस्तान नागरिकांची आणि लष्कराची अक्षरशः भंबेरी उडाली असून सगळीकडे फक्त रडकुंडीचे वातावरण आहे. पाकिस्तानातील सर्व शहरे ‘आयएनएस विक्रांत’ वरील लढाऊ विमानांच्या फक्त अर्धा ते पाऊण तास टप्प्यावर आहेत.**



### हाफिज सईद आणि लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय..

हाफिज सईद हा २६/११ च्या मुंबई हल्ल्याचा ‘मास्टरमाईंड’ आणि लष्कर-ए-तोयबा य...

### अमित शाह यांचा संताप..

भारत युद्ध सुरू करणार हे निश्चित झाले असून त्या दृष्टीने पाच प्रमुख ‘टार्गेट्स’ ही निश्चित करण्यात आली आहेत. या दरम्यान गृहमंत्री अमित शाह यांनी थेट धमकी दिली असून “चुन चुन के मारेंगे! “ असा इशाराही दिला आहे. भारताने निश्चित केलेली पाकिस्तानची प्रमुख पाच टार्गेट्स असून तेथे पाकिस्तानने सुरक्षा वाढवली आहे.

### 5 दहशतवादी संघटना..

दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या पाच प्रमुख दहशतवादी संघटना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानी सैन्याचा समावेश असलेले पाच प्रमुख टार्गेट भारताच्या रडारवर आहेत. भारत पाकिस्तानविरुद्ध मोठी कारवाई करू शकतो आणि अशा परिस्थितीत, पाकिस्तानमध्ये असलेल्या दहशतवाद्यांच्या अनेक ‘मास्टरमाईंड’ असलेल्यांचे अड्डे देखील भारताच्या टार्गेटवर आहेत. त्यापैकी पहिले नाव कुख्यात दहशतवादी हाफिज सईदचे आहे.

### मसूद अझहरचा अड्डा..

‘जैश-ए-मोहम्मद’ या दहशतवादी संघटनेचा प्रमुख मसूद अझहर हा दुसरा महत्त्वाचा ‘टार्गेट’ आहे. २०१९ मधील पुलवामा हल्ल्यासह अनेक मोठ्या हल्ल्यांमागे जैश-ए-मोहम्मदचा हात आहे. अझहर सध्या पाकिस्तानातील पंजाब प्रांतातील बहावलपूर येथून आपल्या कारवाया चालवतो. तिथेच ‘जैश-ए-मोहम्मद’चे मुख्य प्रशिक्षण केंद्र आहे.

### पाक सैन्याचे मुख्यालय, जनरल आसिम मुनीर

पाकिस्तानी सैन्याचे प्रमुख जनरल आसिम मुनीर हे २०२२ पासून या पदावर आहेत. त्यांच्यावर पुलवामा हल्ला आणि पहलगाम हल्ला यासारख्या दहशतवादी हल्ल्यांना पाठिंबा देण्याचा आरोप आहे. या काळात ते ‘आयएसआय’ (इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स) चे प्रमुख होते. पाकिस्तानी सैन्याचे मुख्यालय रावळपिंडी येथे आहे, मुनीर यांच्यावर भारतात दहशतवादी कारवाया भडकवण्याचा आरोप आहे. त्यांनी लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद यांसारख्या संघटनांना पाठिंबा दिल्याचा दावा केला जात आहे. भारताच्या संभाव्य कारवाईच्या भीतीने ते रावळपिंडीतील एका बंकरमध्ये लपले आहेत.

### ‘आयएसआय’ चे मुख्यालय

पाकिस्तानची गुप्तचर संस्था ‘आयएसआय’ हे भारतातील सीमेपलीकडील दहशतवादाचे मुख्य प्रायोजक मानले जाते. पहलगाम हल्ल्यासह अनेक दहशतवादी हल्ल्यांमागे ‘आयएसआय’ चा हात असल्याचा आरोप आहे. ‘आयएसआय’ चे मुख्यालय इस्लामाबाद येथे आहे, जिथून दहशतवादी संघटनांना आर्थिक पाठिंबा दिला जातो.

### स्कर्दू एअरबेस, लढाऊ विमानांचा तळ

पाकिस्तानने आपली लढाऊ विमाने भारताच्या सीमेजवळील स्कर्दू एअरबेसवर तैनात केली आहेत. गिलगिट - बाल्टिस्तानमधील हे एअरबेस सामरिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. येथून तैनात जे-एफ १७ थंडर आणि एफ- १६ विमाने काही मिनिटांत भारतीय हवाई हद्दीत प्रवेश करू शकतात.

### हीच ती पाच टार्गेट्स !

पहलगाम हल्ल्याने भारत आणि पाकिस्तानमधील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. भारताने या हल्ल्याचा सूड घेण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे ठरवले असून, हाफिज सईद, मसूद अझहर, आसिम मुनीर, आयएसआय आणि स्कर्दू एअरबेस ही प्रमुख टार्गेट्स असण्याची शक्यता आहे.

# मिळकतकराची बिले वाटपास सुरुवात!

## पहिल्या दोन दिवसांत पाच कोटींचा महसूल जमा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या बिलांचे वाटप करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मिळकतकराची साडेबारा लाख मिळकतींची बिले तयार असून, ती संबंधितांना टपाल विभागामार्फत पाठविण्यात आली आहे. पहिल्या दोन दिवसांत नागरिकांनी पाच कोटी रुपयांचा महसूल पालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे, मिळकतकर विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी ही माहिती दिली.**

महापालिकेच्या वतीने दरवर्षी एक एप्रिलपासून मिळकतकराची बिले नागरिकांना दिली जातात. मात्र, यंदा ४० टक्के सवलत मिळविण्यासाठीचे पीटी-३ अर्जावर निर्णय न झाल्याने महापालिकेने एक महिना उशिरा बिले देण्यास सुरुवात केली. नागरिकांना महापालिकेने जाहीर केलेल्या विविध सवलतींचा फायदा घेऊन बिल भरण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदत असणार आहे. याचा फायदा घेऊन अधिकाधिक मिळकतकरदारांनी बिल भरावे, असे आवाहन प्रतिभा पाटील यांनी केले आहे. बिले भरण्याचा संदेश संबंधित मिळकतकरधारकाच्या मोबाईलवर पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मिळकतकरात ४० टक्के सवलत घेण्यासाठी पीटी ३ अर्ज भरून देणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांचे अर्ज मंजूर झाले आहेत, त्यांना ही सवलत मिळणार आहे. ज्यांचे अर्ज अपुऱ्या कागदपत्रांअभावी




अमान्य झाले. त्यांनी नव्याने अर्ज भरावे, ते पात्र ठरल्यानंतर त्यांना ४० टक्के सवलत दिली जाणार आहे.मिळकतकराची बिलांचे वाटप सुरू करण्यात आल्याने त्यावर काही नागरिकांचा आक्षेप असतो. त्यांच्या तक्रारीचे समाधान करण्यासाठी प्रत्येक भागातील मिळकतकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात बसावे. तेथेच नागरिकांच्या तक्रारीचे समाधान करावे. संबंधित अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्यास नागरिक थेट महापालिकेच्या मुख्य कार्यालयात हेलपाटे मारतात. हे टाळण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यालय सोडू नये, अशा सूचना देण्यात आल्याचे उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी सांगितले. जे अधिकारी, कर्मचारी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशाराही पाटील यांनी दिला आहे.महापालिकेच्या वतीने दरवर्षी एक एप्रिलपासून मिळकतकराची बिले नागरिकांना दिली जातात. मात्र, यंदा ४० टक्के सवलत मिळविण्यासाठीचे पीटी-३ अर्जावर निर्णय न झाल्याने महापालिकेने एक महिना उशिरा बिले देण्यास सुरुवात केली. नागरिकांना महापालिकेने जाहीर केलेल्या विविध सवलतींचा फायदा घेऊन बिल भरण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदत असणार आहे. याचा फायदा घेऊन अधिकाधिक मिळकतकरदारांनी बिल भरावे, असे आवाहन प्रतिभा पाटील यांनी केले आहे. बिले भरण्याचा संदेश संबंधित मिळकतकरधारकाच्या मोबाईलवर पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मिळकतकरात ४० टक्के सवलत घेण्यासाठी पीटी ३ अर्ज भरून देणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांचे अर्ज मंजूर झाले आहेत, त्यांना ही सवलत मिळणार आहे. ज्यांचे अर्ज अपुऱ्या कागदपत्रांअभावी अमान्य झाले.

### पुन्हा अर्ज करता येणार

मिळकतकराची बिलांचे वाटप सुरू करण्यात आल्याने त्यावर काही नागरिकांचा आक्षेप असतो. त्यांच्या तक्रारीचे समाधान करण्यासाठी प्रत्येक भागातील मिळकतकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात बसावे. तेथेच नागरिकांच्या तक्रारीचे समाधान करावे. संबंधित अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्यास नागरिक थेट महापालिकेच्या मुख्य कार्यालयात हेलपाटे मारतात. हे टाळण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यालय सोडू नये, अशा सूचना देण्यात आल्याचे उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी सांगितले. जे अधिकारी, कर्मचारी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशाराही पाटील यांनी दिला आहे.

# जागतिक वारसा यादीत शिवनेरी

## रायगडसह 12 किल्ल्यांच्या समावेशाची शिफारस

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने जागतिक वारसा यादीत महाराष्ट्रातील शिवनेरी, रायगडसह ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी अशा १२ किल्ल्यांचा समावेश करण्याची शिफारस केली आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने याबाबतचा अहवाल तयार करून तो युनेस्कोच्या जागतिक वारसा केंद्राकडे पाठविला आहे. जागतिक वारसा यादीत महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचा समावेश करण्याची मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केली होती.**



या मागणीची दखल घेत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने शिवनेरी, रायगडसह राज्यातील ११ आणि तामिळनाडूमधील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश असलेला अहवाल युनेस्कोच्या जागतिक वारसा केंद्राकडे पाठविला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील अनेक गडकिल्ले मराठ्यांच्या वैभवशाली सोनेरी इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. या गडकिल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत व्हावा यासाठी शिफारस करण्याची मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे केली होती. शेखावत यांनी दिलेल्या निर्देशानुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने 'भारताचे मराठा सैनिकी लँडस्केप्स' अहवाल तयार करून युनेस्कोच्या जागतिक वारसा केंद्राकडे सादर केला आहे.भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने राज्यातील रायगड, राजगड, शिवनेरी, प्रतापगड, पन्हाळा, विजयदुर्ग, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी या ११ किल्ल्यांचा आणि तामिळनाडूमधील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश केला आहे. केंद्रीय मंत्री शेखावत यांनी खासदार डॉ. कोल्हे यांना पाठविलेल्या पत्रात ही माहिती नमूद करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री शेखावत यांनी मागणीची दखल घेऊन छत्रपती श्री शिवरायांच्या गडकिल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत नामनिर्देशित करण्यासाठीच्या यादीत केला आहे. जागतिक वारसा यादीत गडकिल्ल्यांचा समावेश झाल्यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गडकिल्ल्यांची माहिती जागतिक पटलावर येईल. मागणीची दखल घेत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने शिवनेरी, रायगडसह राज्यातील ११ आणि तामिळनाडूमधील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश असलेला अहवाल युनेस्कोच्या जागतिक वारसा केंद्राकडे पाठविला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील अनेक गडकिल्ले मराठ्यांच्या वैभवशाली सोनेरी इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. या गडकिल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत व्हावा यासाठी शिफारस करण्याची मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे केली होती. शेखावत यांनी दिलेल्या निर्देशानुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने 'भारताचे मराठा सैनिकी लँडस्केप्स' अहवाल तयार करून युनेस्कोच्या जागतिक वारसा केंद्राकडे सादर केला आहे.भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने राज्यातील रायगड, राजगड, तामिळनाडूमधील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांचा समावेश केला आहे.

### सोनेरी इतिहासाची साक्ष

खासदार डॉ. कोल्हे यांना पाठविलेल्या पत्रात ही माहिती नमूद करण्यात आली आहे.घेऊन छत्रपती श्री शिवरायांच्या गडकिल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत नामनिर्देशित करण्यासाठीच्या यादीत केला आहे. जागतिक वारसा यादीत गडकिल्ल्यांचा समावेश झाल्यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गडकिल्ल्यांची माहिती जागतिक पटलावर येईल.

## आंदोलनामुळे पोलिसांनी केली महापालिका बंद

# अनधिकृत प्रार्थनास्थळांना नोटिसांचा वाद पेटला!

## मोठ्या बंदोबस्तामुळे प्रशासकीय इमारतीला छावणीचे स्वरूप

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने चिखली-कुदळवाडीतील अनधिकृत प्रार्थनास्थळांना नोटीस देण्यात आली आहे. त्याविरोधात महापालिकेच्या मुख्य इमारतींसमोर नागरिकांनी आंदोलन सुरू केले आहे. मात्र, शुक्रवारी (दि.२) सकाळी अकरानंतर अचानक पोलिसांनी बंदोबस्त वाढवत महापालिकेच्या समोरील रस्ता बंद केला. महापालिकेत येणाऱ्यांना ती बंद असल्याचे सांगत माघारी पाठविले. त्यामुळे नागरिकांनी पोलिसांवर नाराजी व्यक्त केली.**




महापालिकेकडून चिखली, कुदळवाडीत मोठी धडक कारवाई करत अनधिकृत भंगार गोदामे, लघुउद्योग व विविध आस्थापना भुईसपाट करण्यात आल्या. त्यावेळी प्रार्थनास्थळांना कारवाईतून वगळण्यात आले होते; मात्र आता महापालिकेकडून ३१ अनधिकृत प्रार्थनास्थळांना नोटीस बजावण्यात आली असून, बांधकाम काढून घेण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्याविरोधात शांततेत आंदोलन सुरू आहे. मात्र, शुक्रवारी जमाव येणार असल्याची कुणकुण पोलिसांना लागली. त्यामुळे बंदोबस्त वाढवला. दरम्यान, आंदोलकांच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांची भेट घेतली. आयुक्त शेखर सिंह सुटीवरून आल्यानंतर धार्मिक स्थळांच्या नोटिसांबाबत बैठक घेण्याचे आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले.

### महापालिका भवनाकडे येणारे रस्ते बंद

शहरातील नागरिकांनी महापालिका प्रवेशद्वारावर आंदोलनासाठी यावे, अशा आशयाचे संदेश सोशल मिडियावर व्हायरल झाले. त्यामुळे अचानक जमाव महापालिका भवन परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सकाळपासूनच महापालिका भवन आणि पिंपरीतील डॉ. आंबेडकर चौक परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला होता. दुपारनंतर महापालिका भवनाकडे येणारे रस्ते नागरिक आणि वाहनांसाठी बंद करण्यात आले होते.

### नागरिकांचा हेलपाटा

विविध भागातील नागरिक कामानिमित्त महापालिकेत येत असतात. त्यांना पालिकेतील विभाग प्रमुखांना भेटण्यासाठी सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी दुपारी तीन ते सायंकाळी सहा ही वेळ देण्यात आली आहे. शुक्रवारी आंदोलनामुळे पोलिसांनी नागरिकांना प्रवेश दिला नाही. त्यांना चौकांतूनच माघारी पाठवले. त्यामुळे विविध कामासाठी आलेल्या नागरिकांचा हिरमोड झाला.

> आंदोलकांचे शिष्टमंडळ भेटण्यास आले होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. महापालिका आयुक्त, शहर अभियंता आणि आंदोलकांची बैठक घेण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे. त्याबाबत शहर अभियंता यांना निर्देश देण्यात आले आहेत. बंदोबस्ताबाबत निर्णय पोलिस प्रशासनाचा होता.
> **- तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, महापालिका

## मोशी, बोऱ्हाडे परिसरात बांगलादेशी नागरिकांचे वास्तव्य

## बनावट कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशी नागरिकांचा जामीन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बनावट कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशी नागरिकांचा जामीन करून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बोगस जामीनदारासह बनावट कागदपत्रे तयार करणारी व्यक्ती आणि त्यांच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

### मोशी, चिखली, बोऱ्हाडेवाडी परिसरातील मजुरांचे सत्यापन करण्याच्या मागणीवर जोर




दहशतवाद विरोधी पथकातील पोलीस हवालदार दत्तात्रय भागुजी निकम यांनी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी ३ महिला आरोपींसह सम्राट बाळा बाळा (वय २३, रा. सह्याद्री कन्स्ट्रक्शन साईट, लेबर कॅम्प, बोऱ्हाडेवाडी, मोशी, पुणे, मूळगाव - बहादूरपूर, बांगलादेश) तसेच बनावट जामीनदार म्हणून हजर राहिलेले अनोळखी व्यक्ती व बनावट कागदपत्रे तयार करणारे इतर व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### असा झाला उलगडा


पोलिसांच्या माहितीनुसार, भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील बांगलादेशी आरोपींनी खोट्या जामीनदारांच्या मदतीने व बनावट कागदपत्रांचा वापर करून न्यायालयाची व पोलिसांची फसवणूक करत जामीन मिळवला.

जामीनावर सुटल्यावर संबंधित आरोपींनी पुन्हा कधीही न्यायालयात हजेरी लावलेली नाही. तसेच सध्या ते राहत्या पत्त्यावरही सापडत नाहीत. पुढील तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करीत आहेत.

### चिखलीमध्ये बांगलादेशींना आश्रय दिल्याचे उघड

मार्च महिन्यामध्ये चिखली कुदळवाडी भागामध्ये बांगलादेशी महिलेसोबत विवाह करून तिला आश्रय दिला गेल्याचे उघड झाले होते. महिलेचा पर्यटन व्हिसा संपल्यानंतर बांगलादेश येथे परत पाठवणे आवश्यक असताना, तिला पाठवले नाही. याप्रकरणी बांगलादेशी महिलेसह तिच्या पतीला अटक करण्यात आली संबंधित महिला 2022 पासून शहरात वास्तव्याला होती. तीन वर्षांनंतर हा प्रकार उघडकीस आला.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### कोणत्याही कृतीत हेतु शुद्ध पाहिजे

तमोगुण हा तिन्ही गुणांत जास्त जड असल्याने त्याचा परिणाम या जगामध्ये लगेच दिसून येतो. दुष्ट बुद्धी हा तमोगुणाचा परिणाम आहे. परंतु भगवंताच्या नामाने बुद्धी स्वच्छ करण्याची सोय माणसाच्या ठिकाणी आहे. यासाठी पुष्कळ नामस्मरण करावे, म्हणजे सत्त्वगुणाचा उदय होतो आणि बुद्धी शुद्ध बनते. देहाला कष्ट दिले म्हणजे भगवंत वश होतो हे काही खरे नाही. तसे जर असते तर रस्त्यात उन्हामध्ये खडी फोडणाऱ्यांना भगवंत लवकर वश झाला असता ! भगवंताचे लक्ष आपल्या देहापेक्षा मनाकडे असते. आपल्या मनामध्ये प्रापंचिक हेतू ठेवून भगवंताच्या नावाने उपवासासारखे कितीही कष्ट केले तरी, ते पाहून लोक फसतील, पण भगवंत फसणार नाही. आपण जसे बोलतो तसे वागण्याचा अभ्यास करावा. परमार्थामध्ये ढोंग फार बाधक असते. प्रापंचिक गोष्टीकरिता उपवास करणे ही गोष्ट मला पसंत नाही. उपवास 'घडावा' यात जी मौज आहे ती उपवास 'करावा' यामध्ये नाही. भगवंताच्या स्मरणामध्ये इतके तल्लीन व्हावे की आपण नेहमी त्याच्याजवळ वास करतो आहोत असे मनाला वाटावे. मग देहाने अन्न खाल्ले म्हणून कुठे बिघडले ? याउलट, आपल्या चित्तात भगवंताचे नाम नसताना आपण देहाने पुष्कळ उपवास केले, तरी अशक्तपणाशिवाय दुसरे काही पदरात पडणार नाही. काही लोक वेडे असतात; त्यांना आपण उपासतापास कशासाठी करतो आहोत हेच समजत नाही. कोणत्याही कृतीला वास्तविक मोल तिच्या हेतूवरून येते. हेतू शुद्ध असून एखादे वेळी कृती बरी नसली तरी भगवंताच्या घरी चालते; पण हेतू चांगला नसून कृती मात्र फार चांगली असली तरी भगवंत त्यापासून दूरच राहतो. माणसाने केलेला उपवास निष्काम असून, तो केवळ भगवंताच्या स्मरणात राहावे म्हणून केलेला असला तर फारच उत्तम आहे. निष्काम कर्माचे फार फार महत्त्व आहे. 'भगवंतासाठी भगवंत हवा' अशी आपली वृत्ती असावी. किंबहुना, नाम घेत असताना, प्रत्यक्ष भगवंत समोर उभा ठाकला, आणि 'तुला काय पाहिजे ?' असे त्याने विचारले, तर 'तुझे नामच मला दे' हे त्याच्याजवळ मागणे, याचे नाव निष्कामता होय. कारण, रूपाने व्यक्त झालेला भगवंत केव्हातरी नाहीसा होईल, पण त्याचे नाम मात्र अखंड टिकेल; आणि त्याचे नाम घेतले की त्याला आपल्याकडे येणे जरूर आहे. म्हणून, देहाला कष्ट देण्याच्या भानगडीत न पडता भगवंतासाठीच नाम घेत असावे. त्याची कृपा झाल्याशिवाय राहणार नाही.

बोधवचन:- जेथे नाम तेथे राम हा ठेवावा विश्वास। कृपा करील रघुनाथ खास॥

# लई 'बारा' चं बारामती, बारामतीच्या करामती !



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**भारताच्या राजकारणात केव्हा पण राजकीय चर्चा सुरू झाल्या की हमखास विषय निघतो, आणि येऊन थांबतो तो बारामती वर ! या गावानं आणि येथील पवार कुटुंबांनं गेली ५० वर्षे नुसत्या महाराष्ट्रावरच नव्हे, तर संपूर्ण देशावर राजकारणाची छाप पाडली आहे.. सध्या, बघा ना.. लोकसभेचा एक खासदार, राज्यसभेचे दोन खासदार, एक आमदार आणि एक उपमुख्यमंत्री या पवार कुटुंबात !**



### सध्याचे खलनायक..

पूर्वी महाराष्ट्रात, या पवार कुटुंबाशिवाय राजकारणाचं पान हलत नव्हतं..पण, हल्ली काय झालंय..जसजशी राजकारणाची वाळू या पवार कुटुंबाच्या हातातून निसटू लागली आहे, तसतसं त्यांची धोरणं, त्यांची वक्तव्यं भरकटू लागली आहेत आणि सर्वसामान्य माणसाच्या नजरेत हे पवार कुटुंब राजकारणातील 'व्हिलन' म्हणजे खलनायक होत चाललं आहे.

### वडाच्या झाडालाच वाळवी..

बारामतीच्या राजकारणाचा भक्कम वड बहरत असताना आणि त्याच्या फांद्या, पारंब्याही खोलपर्यंत जात असताना अचानक दृष्ट लागावी तशी मती फिरली. शरद पवार यांच्या रूपानं खंबीर उभ्या असणाऱ्या वडाच्या झाडाला वाळवी लागली आणि ते पोखरलं जाऊ लागलं.. त्यांच्याच तालमीत तयार झालेले, त्यांनी उपमुख्यमंत्री बनवलेले त्यांचे पुतणे अजित पवार यांनी शरद पवारांच्या पक्षाला सुरुंग लावला आणि कट्टर विरोधक असणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या दावणीला जाऊन उभे राहिले..जाताना पक्षातील ऐंशी टक्के नेते आणि कार्यकर्ते घेऊन गेले तो भाग वेगळा !

### दहशतवादी हल्ला आणि वक्तव्यं..

काश्मीर खोऱ्यातल्या पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला, त्यावेळी हिंदू पुरुषांना धर्म विचारून दहशतवाद्यांनी अचूक टिपले..जे मारले गेले त्यांच्या पत्नींनी सुद्धा ही व्यथा मांडली.. पण, राजकारणात तोल गेला असल्यामुळं शरद पवार गटाकडून जी वक्तव्यं पुढं आली, ती नक्कीच हिंदूंमध्ये चीड निर्माण करणारी आहेत.

### 'नमाजवादी' राजकारणाचा पिंड..

गेल्या काही दिवसात मतांच्या राजकारणामध्ये मुस्लिमधार्जिणे धोरण स्वीकारता स्वीकारता शरद पवारांचा गट हा देशद्रोही वक्तव्यं करू लागला आहे की काय? अशी शंका येऊ लागली आहे. वक्फ बोर्डाचं सुधारणा विधेयक चर्चेला आलं की सभागृहात त्यांच्या पक्षाच्या खासदारांची दांडी..काश्मीरचं ३७० वं कलम हटवण्याचं विधेयक मंजूर होण्याची वेळ आली की यांच्या खासदारांचा सभात्याग.. हे धोरण आता मतदारांच्या अंगवळणी पडू लागलं आहे!

### अनिल देशमुखांचं बरळणं..

पहलगाम हल्ल्यानंतर एकदा का शरद पवार यांनी उलटी म्हणजे हिंदूंच्या विरोधात भूमिका मांडली, की त्यांचे चेलेही त्याच दिशेनं बडबडू लागले. त्यांचे एकेकाळचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी तर अकलेचे तारे तोडले. ज्या परिवारानं मुलगा, बाप, वडील गमावलेत, त्या पीडित कुटुंबाचं म्हणणं खोटं ठरवण्याचा घाट घालणं या नतद्रष्टांनी सुरू केलं. अनिल देशमुख सारखा भ्रष्ट हिंदुद्रोही राजकारणी म्हणतो, की मारण्या अगोदर धर्म विचारला गेला नाही. घटनास्थळी असणाऱ्या ज्या परिवारानं आपल्या घरातला माणूस गमावला,ते म्हणतात, की धर्म 'कन्फर्म' करून गोळ्या घातल्यात, आणि यांचं म्हणणं वेगळंच!

### राजकारणासाठी कोणत्या थराला?

फक्त मताच्या राजकारणासाठी शरद पवार गट कोणत्याही थराला जाऊ शकतो, दहशतवाद्यांची बाजू घेऊ शकतो! कारण काय तर यांना एकगठ्ठा मत पाहिजेत..मुस्लिमांची मनं दुखावली जाऊ नयेत, म्हणून चढाओढ लागलीय, एकीकडं उद्धव ठाकरे गटाचे विश्वप्रवक्ते संजय राऊत तर दुसरीकडं अनिल देशमुख.. जाणून बुजून दहशतवाद्यांची बाजू घेऊन शरद पवार गट आणि उबाठाची शिल्लक सेना काय साध्य करत आहे, याचे मनन करा, पुढील निवडणुकीत यांना धडा शिकवा !

### नीच मनोवृत्ती दुसरं काय?

दहशतवादी हल्ल्याच्या वेळी पहलगाममध्ये शरद पवार, संजय राऊत, अनिल देशमुख, अमोल कोल्हे, अखिलेश यादव यांच्या परिवारातील कोणीही असते, तर समजलं असतं, दहशतवादी हल्ला कशाला म्हणतात ते ! आणि दहशतवादी काय पाहून मारतात ते ! नीच मनोवृत्ती दुसरं काय? पक्ष संपून आता गटाच्या स्वरूपात शिल्लक राहिलेले शरद पवार गट आणि उबाठा गट महाराष्ट्रद्रोही, हिंदूद्रोही तर होतेच, आज देशद्रोही बनले आहेत.

### अमोल कोल्हेची कोल्हेकुई..

पैशांसाठी छत्रपती शिवाजी महाराज किंवा संभाजी महाराज यांच्या भूमिका करायच्या आणि वास्तवात औरंजेबाच्या विचारावर चालायचं, हाच अमोल कोल्हेचा धंदा आहे. दहशतवादी आणि शरद पवार गटाची भूमिका एक सारखीच हिंदुद्रोही आणि देशद्रोही आहे. निरापराध हिंदू मारले गेले, त्याचे यांना सोयर-सुतक नाही, यांचा जीव फक्त मुस्लिम वोट बँकेवर आहे, त्यासाठी ते दहशतवाद्यांचीही बाजू घेऊ शकतात. अगोदर शरद पवार नंतर सुप्रिया सुळे, अनिल देशमुख आणि आता लबाड कोल्हा दहशतवाद्यांची बाजू घेण्यासाठी पुढं सरसावला आहे. हा कोल्हा जर त्या दहशतवादी हल्ल्यात सापडला असता तर याला कळलं असतं दहशतवादी प्रथम उघडं करून आणि नंतर काय बघून मारतात ते !

### औरंगाबाद नावाला विरोध..

शरद पवार पक्षाचा 'स्टॅन्ड' साफ आहे, शरद पवार गट दहशतवाद्यासोबत आहे. त्यांना दहशतवादी विचारांची एकगठ्ठा मतं हवी आहेत. दहशतवाद्यांकडून मारल्या जाणाऱ्या हिंदूंची किंमत नाही. मराठ्यांची मतं घ्यायची आणि छत्रपती संभाजीनगर नावाला विरोध करायचा, हे शरद पवार पक्षाचं धोरण जुनंच आहे. विखूरलेला हिंदू आपलं काही करू शकत नाही. म्हणून हिंदूंची बाजू शरद पवार कधीच घेणार नाहीत, पण एकगठ्ठा मिळणारी जिहादी मतं शरद पवारांसाठी महत्वाची आहेत.

### औरंग्या फॅन क्लबच्या अध्यक्षा..

आता प्रश्न राहतो तो सुप्रिया सुळे यांचा..त्यांना स्वतःची भूमिका नसते.. रोज पत्रकार परिषदा झोडून प्रसिद्धी मिळवण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांना देश प्रेम, हिंदू प्रेम याच्याशी काय असणार ? वडिलांची पुण्याई आणि राजकारणातले डावपेच याच्या जीवावर खासदार होणाऱ्या सुप्रिया ताईंचे लक्ष फक्त 'सर्वोत्तम संसदपटू' म्हणून गौरव करून घ्यायचा आणि मिरवायचं एवढाच आहे. औरंग्या फॅन क्लबच्या तहहयात अध्यक्षा हे पद सुप्रियाताईंना लागू पडतं, हे कुणीही मान्य करेल. बारामतीच्या या खालच्या थराच्या राजकारणाला जनता वैतागली आहे. त्यातून अजित पवार हळूच सटकले असून रोहित पवार यांना कधी शहाणपण येणार, देव जाणे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाबळेश्वर आंतरराष्ट्रीय नकाशावर जाईल!

## महाबळेश्वरला अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध : शिंदे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाबळेश्वरला पर्यटनाच्या अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. आंतरराष्ट्रीय पर्यटनाच्या नकाशावर महाबळेश्वरचे नाव कोरले जाईल या उद्देशाने महाबळेश्वर महामहोत्सव आयोजित करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाबळेश्वर येथे सांगितले.**



### सी लिंकच्या धर्तीवर मोठा पूल

पर्यटकांची सुरक्षा आणि सुरक्षितता यासाठी महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल स्थापन करण्यात आले आहे. येथील जंगल राखले पाहिजे आणि पर्यटनही वाढले पाहिजे. मुनावळे येथे आंतरराष्ट्रीय बोट क्लब, वॉटर स्पोर्ट्स, स्कुबा डायव्हिंग सुरू करण्यात येत आहे. तापोळा येथे सी लिंकच्या धर्तीवर मोठा पूल, निसर्गाचं अवलोकन करण्यासाठी गॅलरी उभारली आहे. महाबळेश्वर येथे पहिल्यांदा पर्यटन महोत्सव होत आहे.राज्यातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन विभागाने पावले उचलली आहेत.


महाबळेश्वर पर्यटन महामहोत्सव २०२५ चे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गोल्फ मैदान येथे झाले. या वेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यटन व पालकमंत्री शंभूराजे देसाई, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर आदी मान्यवर उपस्थित होते. महाबळेश्वरला एक इतिहास आहे. आजूबाजूला गडकिल्ले आहेत. सध्याच्या जागतिकीकरणामध्ये पर्यटनाला खूप महत्त्व आहे. पर्यावरणपूरक पर्यटन महाबळेश्वरने कायमस्वरूपी राखले आहे. येथील जंगलामध्ये अनेक औषधी वनस्पतींचा खजिना आहे. कोयना धरणाचे पाणी आहे. त्यामुळे येथील जंगल जगवून आणि मिळालेल्या शिवसागर जलाशयाच्या पाण्याचा पुरेपूर वापर करून पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या चांगल्या योजना राबविण्यात येणार आहेत. येथे पुस्तकांचे आणि मधाचे गाव आहे. या पर्यटन महोत्सवाकडे उत्सव म्हणून न पाहता महाराष्ट्राच्या संस्कृतीचा मानबिंदू म्हणून पहावे असेही शिंदे म्हणाले.पर्यटकांची सुरक्षा आणि सुरक्षितता यासाठी महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल स्थापन करण्यात आले आहे. येथील जंगल राखले पाहिजे आणि पर्यटनही वाढले पाहिजे. मुनावळे येथे आंतरराष्ट्रीय बोट क्लब, वॉटर स्पोर्ट्स, स्कुबा डायव्हिंग सुरू करण्यात येत आहे. तापोळा येथे सी लिंकच्या धर्तीवर मोठा पूल, निसर्गाचं अवलोकन करण्यासाठी गॅलरी उभारली आहे. महाबळेश्वर येथे पहिल्यांदा पर्यटन महोत्सव होत आहे. यासाठी राज्य पर्यटन आणि पर्यटन विकास महामंडळ सक्रिय आहे. राज्यातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन विभागाने पावले उचलली आहेत. येथे अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ, औषधी गुणधर्म असलेले पदार्थ, वस्तू आणि बचत गटांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. या ठिकाणी कायमस्वरूपी बचत गटांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत असताना पर्यटनावर भर देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. जागतिक पातळीवरून पर्यटक या ठिकाणी आला पाहिजे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे अर्थकारणाला चालना मिळेल असे त्यांनी सांगितले. या वेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे भाषण झाले. या वेळी उपस्थित जपानी पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.महाबळेश्वर पर्यटन महामहोत्सव २०२५ चे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गोल्फ मैदान येथे झाले. या वेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यटन व पालकमंत्री शंभूराजे देसाई, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर आदी मान्यवर उपस्थित होते. महाबळेश्वरला एक इतिहास आहे. आजूबाजूला गडकिल्ले आहेत. सध्याच्या जागतिकीकरणामध्ये पर्यटनाला खूप महत्त्व आहे. पर्यावरणपूरक पर्यटन महाबळेश्वरने कायमस्वरूपी राखले आहे. येथील जंगलामध्ये अनेक औषधी वनस्पतींचा खजिना आहे. कोयना धरणाचे पाणी आहेआकर्षित करणाऱ्या चांगल्या योजना राबविण्यात येणार आहेत. येथे पुस्तकांचे आणि मधाचे गाव आहे. या पर्यटन महोत्सवाकडे उत्सव म्हणून न पाहतासंस्कृतीचा मानबिंदू म्हणून पहावे असेही शिंदे म्हणाले.

# आरटीई प्रवेशाकडे पालकांनी फिरवली पाठ

## रत्नागिरी जिल्ह्यात 257 तर तालुक्यात 126 जागा रिक्तच

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रत्नागिरी तालुक्यातील पालकांनी आरटीई च्या मोफत शिक्षण संकल्पनेकडे पाठ फिरवले असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आरटीईच्या एकूण ७९७ रिक्त जागांपैकी आतापर्यंत ५४० प्रवेश निश्चीत झाले आहेत. रत्नागिरी तालुक्यात १२६ जागा तर जिल्ह्यात एकूण २५७ जागा अद्याप रिक्त आहेत.**




### 540 विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले

रत्नागिरी जिल्ह्यात या आरटीई प्रवेशाच्या एकूण असलेल्या ७९७ रिक्त जागांपैकी तिसऱ्या फेरीअखेर ५४० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चीत झाले आहेत. तर रत्नागिरी तालुक्यातील १२६ विद्यार्थ्यांच्या पालकांनी प्रवेशाकडे पाठ फिरवली असल्याने जिल्ह्यात एकूण २५७ जागांवरील प्रवेश शिल्लक राहिले आहेत.शिक्षण हक्क कायद्यांतर्गत समाजातील वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते. यासाठी खासगी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये २५ टक्के जागा या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जातात. शिक्षण विभागाकडून राज्यस्तरावर ही प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. यंदा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पहीलीपासून आरटीई प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे.रत्नागिरी जिल्ह्यात तिसऱ्या फेरी पर्यत एकूण ५४० विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले आहेत

रत्नागिरी तालुकानिहाय आरटीई पात्र स्कूल, रिक्त जागा आणि प्राप्त अर्ज शिक्षण हक्क कायद्यांतर्गत समाजातील वंचित, दुर्बल, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात येत आहे. रत्नागिरी जिल्ह्यात या आरटीई प्रवेशाच्या एकूण असलेल्या ७९७ रिक्त जागांपैकी तिसऱ्या फेरीअखेर ५४० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चीत झाले आहेत. तर रत्नागिरी तालुक्यातील १२६ विद्यार्थ्यांच्या पालकांनी प्रवेशाकडे पाठ फिरवली असल्याने जिल्ह्यात एकूण २५७ जागांवरील प्रवेश शिल्लक राहिले आहेत.शिक्षण हक्क कायद्यांतर्गत समाजातील वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते. यासाठी खासगी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये २५ टक्के जागा या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जातात. शिक्षण विभागाकडून राज्यस्तरावर ही प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. यंदा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पहीलीपासून आरटीई प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे.अजूनही या प्रवेशाच्या एकूण २५७ जागा शिल्लक राहिल्या आहेत.रत्नागिरी तालुकानिहाय आरटीई पात्र स्कूल, रिक्त जागा आणि प्राप्त अर्ज शिक्षण हक्क कायद्यांतर्गत सामाजिक व मागास घटकांतील विद्यार्थ्यांना पहिली ते आठवीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात येत आहे.

# जातगणनेवरून केंद्राला घेरणार!

## जातगणनेचे श्रेय बैठकीमध्ये राहुल गांधींना देण्यात आले

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जातिनिहाय जनगणनेची केंद्र सरकारने घोषणा केल्यानंतर, या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाचे श्रेय भाजपने घेण्यास सुरुवात केल्यामुळे शुक्रवारी काँग्रेसने कार्यकारी समितीची बैठकीत प्रत्युत्तर देण्याची रणनीती आखली. हा मुद्दा काँग्रेसच्या हातून निसटू नये यासाठी जातगणनेच्या इतर संवेदनशील मुद्द्यांवरून केंद्राची कोंडी केली जाण्याची शक्यता आहे. समितीच्या बैठकीत पहलगामसंदर्भातही ठराव संमत केला गेला.**



काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातिनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने केली होती. जातगणनेला कडाडून विरोध करणाऱ्या भाजपला अखेर नमते घ्यावे लागले, त्याचे श्रेय बैठकीमध्ये राहुल गांधींना देण्यात आले. '१६ एप्रिल २०२३ रोजी पंतप्रधान मोदींना पत्र लिहून हीच मागणी करण्यात आली होती. त्यावेळी केंद्र सरकारने जातगणनेला विरोध केला होता. मग, भाजपचे अचानक हृदय परिवर्तन कसे झाले', असा प्रश्न पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बैठकीमध्ये केला. कार्यकारी समितीच्या बैठकीसाठी प्रामुख्याने तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांना निमंत्रण देण्यात आले होते. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदरसिंह सुक्खूही बैठकीला हजर होते. काँग्रेसकडून तेलंगणातील जातगणनेच्या प्रारूपाचा प्रचार केला जाणार आहे. तेलंगणातील काँग्रेस सरकारने जातिनिहाय सर्वेक्षणासाठी सखोल प्रश्न तयार केले आहेत. त्यासाठी केवळ नोकरदारांच्या प्रश्नावलींवर अवलंबून न राहता सामाजिक क्षेत्रांतील तज्ज्ञांशी चर्चा करण्यात आली आहे. जातगणनेची केंद्राने घोषणा केली असली तरी त्याचे तपशील जाहीर केलेले नाहीत.

त्यामुळे तेलंगणाचे प्रारूप लोकांपर्यंत पोहोचवण्यावर बैठकीमध्ये खल केला असून हा मुद्दा ठरावामध्येही समावेश करण्यात आला.जातगणना हा मागास समाजाच्या विकासातील पहिला टप्पा असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले होते.त्यामुळे काँग्रेसच्या बैठकीमध्ये जातगणनेच्या पुढील टप्प्यांबाबतही चर्चा करण्यात आली.

खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसी, अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव जागा असल्या पाहिजेत, आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा काढून टाकली पाहिजे, या मुद्द्यांवर केंद्र सरकारने भूमिका स्पष्ट केलेली नाही.

त्यामुळे काँग्रेसने या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. २०१९ व २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात तसेच, २०२२ मधील उदयपूर, २०२३मध्ये रायपूर या दोन्ही अधिवेशनामध्येही जातगणनेची मागणी काँग्रेसने केली होती, त्याचा उल्लेख ठरावामध्ये करण्यात आला आहे. मात्र, राहुल गांधींनी मांडलेल्या दोन नव्या मुद्द्यांना ठरावामध्ये अधिक महत्त्व देण्यात आले आहे.

### दहशतवाद नष्ट करण्याची हीच वेळ

पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारच्या स्तरावर बैठकांचे सत्र सुरू असले तरी असून ठोस कारवाई झालेली नाही. त्याचा संदर्भ देत खरगेंनी, केंद्राच्या सुरक्षेतील त्रुटींनाही जबाबदार कोण, हे स्पष्ट केलेले नाही. या त्रुटीची जबाबदारी निश्चित केली पाहिजे, असे खरगे म्हणाले. या हल्ल्यातील मृतांना शहीद घोषित करण्याची मागणीही बैठकीमध्ये करण्यात आली.खरगेंनी समितीच्या बैठकीमध्ये केंद्राविरोधात आगपाखड केली असली तरी, काँग्रेसने पहलगामसंदर्भातील ठराव मात्र सकारात्मक असेल याची दक्षता घेतली. आपण सगळ्यांनी सामूहिक इच्छाशक्ती दाखवून पाकिस्तानला धडा शिकवण्याची व दहशतवाद कायमचा नष्ट करण्याची हीच वेळ आहे. पहलगाममधील भ्याड हल्ल्यातील दहशतवादी व त्यांच्या सूत्रधारांना किंमत चुकवावी लागेल. केंद्र सरकारने ठामपणे, स्पष्ट धोरण रावबून पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर एकटे पाडण्यासाठी विविध देशांशी समन्वय साधला पाहिजे.

काँग्रेसप्रणित यूपीए-२ सरकारच्या काळात २०११ मध्ये सुरू झालेली जातगणनेची प्रक्रिया ३१ मार्च २०१६ मध्ये पूर्ण झाली.

ही बाब मोदी सरकारने २०२२ मध्ये राज्यसभेत मान्य केली होती. असे असताना २०१४मध्ये आमच्या सरकारने यासंदर्भात अंतिम नसलेली आकडेवारी जाहीर करण्याची अपेक्षा बाळगणे अपरिपक्वपणाचे होते, अशी टीका खरगेंनी भाजपवर केली.केंद्र सरकारने तातडीने जातगणनेला सुरुवात केली पाहिजे,अशी मागणी सचिन पायलट यांनी बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत केली.पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याविरोधातील केंद्र सरकारच्या कारवाईला काँग्रेसचा पाठिंबा असेल पण, दहा दिवसांनंतर देखील केंद्र सरकारकडे स्पष्ट धोरण नसल्याची टीका खरगेंनी केली.

---

# भारताच्या लष्करी कारवाईची पाकिस्तानला भीती!

## जीवनावश्यक वस्तूंचा साठा करण्याचे नागरिकांना आवाहन

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाल्यानंतर भारतासोबत संघर्ष होण्याची भीती असल्याने पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरमधील (पीओके) रहिवाशांना अन्न, औषधे आणि जीवनावश्यक वस्तूंचा साठा करण्याचे आदेश दिले आहेत.**



पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानने सीमेवर सलग आठ वेळा गोळीबार केला आहे. भारताने आपल्या लष्कराला पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य दिल्यानंतर, पाकिस्तानातून आता दावे करण्यात येत आहेत की, भारत त्यांच्यावर हल्ला करणार असल्याची गुप्तचर माहिती त्यांच्याकडे आहे. तणाव वाढत असताना दोन्ही देशांनी त्यांच्या राजदूतांना परत बोलावले असून, सीमा बंद केल्या आहेत.पीओकेचे पंतप्रधान चौधरी अन्वरुल हक यांनी सर्वपक्षीय बैठकीनंतर जारी केलेल्या आदेशानुसार, नियंत्रण रेषेजवळ राहणाऱ्या रहिवाशांना अन्न आणि आवश्यक वस्तूंचा साठा करण्यास सांगितले आहे.

तसेच, नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेच्या इतर लगतच्या भागात पर्यटकांचा प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तसेच जाहीर केलेल्या अनेक उपाययोजनांमध्ये पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमधील धार्मिक मदरसे बंद करणे, तसेच लष्करी संघर्ष झाल्यास करावयाच्या मदत उपाययोजनांना पाठिंबा देण्यासाठी १ अब्ज रुपयांचा आपत्कालीन प्रतिसाद निधी स्थापन करणे यांचा समावेश होता.याव्यतिरिक्त, नीलम, झेलम, पूंछ, हवेली, कोटली आणि भिंबर यासारख्या प्रमुख

### संयम बाळगण्याचे आवाहन

याचाच भाग म्हणून भारताने पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादल आहेत. याचबरोबर सिंधू जल करारही स्थगित केला आहे. दरम्यान जगभरातील अनेक देशांचे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील घडामोडींवर लक्ष असून, अमेरिकेसह अनेक देशांनी दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

नियंत्रण रेषेतील मतदारसंघांमध्ये रस्ते खुले राहावेत यासाठी अधिकृत आणि खाजगी यंत्रणा तैनात करण्यात आल्या आहेत. पीओकेमधील नागरी संरक्षण दलांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

तर स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने रहिवाशांना कोणत्याही तातडीच्या मदतीची आवश्यकता असल्यास आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक ११२२ देखील जारी केली आहे. पीओकेमधील अधिकारी नियंत्रण रेषेपलीकडे भारतीय सीमेवरील परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह वरिष्ठ भारतीय नेत्यांनी लष्करी कारवाई आणि योग्य लष्करी प्रत्युत्तर देण्याच्या आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर, कराची आणि नी केलेल्या हल्ल्यात २५ पर्यटक आणि एका स्थानिक नागरिकाचा मृत्यू झाल्यापासून भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे.

## नवरी मिळे हिटलरला' मधील एजे आहे घटस्फोटित

'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका एकापेक्षा एक कलाकार, कथा व सतत येणारे ट्विस्ट यामुळे लोकप्रिय आहे. या मालिकेतील एजे व लीला ही जोडी प्रेक्षकांची लाडकी आहे. एजे व लीला यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना आवडत असल्याचे पाहायला मिळते. त्यांची छोटी-मोठी भांडणे, एकमेकांवरचे प्रेम, त्यांची एकमेकांबद्दल असणारी ओढ, काळजी यांमुळे त्याचे सीन पाहण्यास प्रेक्षक उत्सुक असतात. दोघांच्या स्वभावात खूप मोठा फरक असला तरी ते एकत्र आल्यानंतर परिपूर्ण वाटतात. आता एजेची पहिली पत्नी अंतरा पुन्हा त्यांच्या आयुष्यात आली आहे.अंतरा एजेची पहिली पत्नी आहे, जिच्यावर एजेचे खूप प्रेम होते. मात्र, एका अपघातानंतर अंतराचा मृत्यू झाला, असे एजेसह जहागीरदार कुटुंबाला वाटत होते. त्यामुळे एजेच्या आईने त्याचे दुसरे लग्न केले. लीला त्याच्या आयुष्यात आल्यानंतरही तो अंतराच्याच प्रेमात होता. मात्र, लीलाने तिच्या प्रामाणिकपणाने, प्रेमळ स्वभावाने एजेचे मन जिंकले आणि मग एजे तिच्या प्रेमात पडला. आता अंतराच्या येण्याने अनेक गोष्टी बदलत असल्याचे दिसत आहे. मात्र, मालिकेत दोन पत्नी असणाऱ्या एजेचा खऱ्या आयुष्यात मात्र घटस्फोट झाला आहे.मालिकेतील एजे ही भूमिका अभिनेता राकेश बापटने साकारली आहे. अभिनेत्याने लोकप्रिय अभिनेत्री रिद्धी डोगराशी लग्नगाठ बांधली होती. रिद्धी डोगरा व राकेश बापट हे 'मर्यादा : लेकिन कब तक?' या मालिकेच्या सेटवर भेटले होते. त्यानंतर ते प्रेमात पडले. २०११ मध्ये त्यांनी लग्नगाठ बांधली. आठ वर्षांच्या संसारानंतर या जोडप्याने वेगळे होण्याचा निर्णय घेतला. २०१९ ला त्यांनी घटस्फोट घेतला. रिद्धी डोगरा 'राधा कि बेटियाँ कुछ कर दिखायेंगी', 'माता-पिता के चरणों में स्वर्ग', 'लागी तुझसे लगन', 'मर्यादा : लेकिन कब तक?', 'वो अपना सा', अशा मालिकांतून घराघरात पोहोचली. तिने 'असुर', 'मॅरिड वूमन' अशा अनेक वेब सीरिजमध्ये काम केले आहे. रिद्धी डोगराने शाहरुख खानबरोबर 'जवान' चित्रपटात काम केले आहे.

# निक्कीचा 'झापुक झुपूक'ला पाठिंबा



'बिग बॉस' मराठीच्या पाचव्या पर्वाची बरीच चर्चा झाली.' बिग बॉस' मराठीचं हे पर्व सूरज चव्हाण, निक्की तांबोळी, अंकिता वालावलकर, जान्हवी किल्लेकर या स्पर्धकांनी गाजवलं होतं. 'बिग बॉस'ने दिलेल्या टास्कदरम्यान या स्पर्धकांमध्ये अनेकदा भांडणं, बाचाबाची होताना दिसली. जान्हवी, निक्की या दोघी तर बऱ्याचदा त्यांनी केलेल्या विधानांमुळे ट्रोलही झाल्या.

अशातच आता या दोघी पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. याचं निमित्त म्हणजे सूरज चव्हाणची मुख्य भूमिका असलेला 'झापुक झुपूक' चित्रपट. हा चित्रपट शुक्रवारी (२५ एप्रिल २०२५ रोजी) प्रदर्शित झाला. 'झापुक झुपूक' चित्रपटाला प्रदर्शित होऊन आज सात दिवस झाले आहेत. या चित्रपटाच्या टीझर व ट्रेलरची प्रचंड चर्चा झाली, त्यामुळे या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये खूप उत्सुकता होती, पण हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर मात्र त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. अशावेळी सूरजला पाठिंबा देण्यासाठी जान्हवी किल्लेकर व निक्की तांबोळी यांनी 'झापुक झुपूक'चे शो बुक केले आहेत. याबद्दलची माहिती जान्हवी व निक्की यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून मिळत आहे. केतन माणगावकर यांनी इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करीत याबद्दल सांगितलं आहे. केतनने स्टोरीमार्फत म्हटलं आहे की, ""बिग बॉस' म्हणजे भांडणं, 'बिग बॉस' म्हणजे क्लेश... 'बिग बॉस'च्या आतली नाती म्हणजे दिखावा, असे अनेक आरोप झाले आणि ह्यापुढेही होतील. पण, एका गोष्टीचं कौतुक करावसं वाटतं.सिझन संपून काळ लोटलाय. आता नव्या सिझनची वाट पाहू लागलेत लोक."याबाबत बोलताना ते पुढे म्हणाले,"अशा वेळी सूरजच्या सिनेमासाठी 'झापुक झुपूक'साठी 'बिग बॉस' मराठीचे इतर सदस्य उभे राहिलेत हे पाहून कौतुक वाटतं. "जान्हवी आणि निक्की ह्यांना खूप काही बोललं गेलं, पण आज त्याच दोघींनी अख्खं थिएटर बुक करून सूरजच्या पाठीमागे उभं राहायचं ठरवलं.

## आम्ही सतत भांडतच असतो


'लक्ष्मी निवास' या मालिकेत अनेक कलाकार काम करताना दिसतात. मालिकेतील सर्वच पात्रे वेगवेगळ्या स्वभावाची असल्याचे दिसते. लक्ष्मी व श्रीनिवासच्या कुटुंबाची ही गोष्ट सध्या प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसत आहे. या मालिकेत लक्ष्मी व श्रीनिवास यांना ३ मुली व २ दोन मुले असल्याचे दिसते. मंगल, भावना व जान्हवी या मुली आणि संतोष व हरिश ही मुले आहेत. भावना, जान्हवी समजूतदार आहेत. पण, मंगल, संतोष व हरिश स्वतःचा विचार करणारी असल्याचे दिसतात. या मालिकेत हरिश ही भूमिका अनुज ठाकरेने साकारली आहे. तर त्याच्या पत्नीची सिंचनाची भूमिका तन्वी कोलतेने साकारली आहे.आता अभिनेता अनुज व अभिनेत्री तन्वीने 'स्टार मराठी मीडिया'शी नुकताच संवाद साधला. यावेळी मालिकेत त्यांचे एकमेकांबरोबर कसे बॉण्डिंग आहे, याबद्दल त्यांनी वक्तव्य केले. तन्वी म्हणाली, "आम्ही सतत भांडतच असतो. २४ तासांमधील आम्ही २३ तास ५९ मिनिटे भांडत असतो. पण, ती भांडणे गोड असतात. मी त्याला माझी सगळी कामं सांगते."त्यावर तो म्हणतो की सिंचु तुला कळतंय का मी आता हॅरी नाहीये. मी आता अनुज आहे आणि तू तन्वी आहे.

## प्रियांका चोप्राची तीन वर्षांची मुलगी मालती शिकतेय कराटे



अभिनेत्री प्रियांका चोप्राने २०१८ मध्ये अमेरिकन गायक निक जोनासशी लग्न केलं. वयात १० वर्षांचं अंतर असल्याने प्रियांका व निक यांच्या नात्याबद्दल नेहमी चर्चा होत असते. प्रियांका आणि निक यांच्या लग्नाला ६ वर्षे झाली असून त्यांना मालती मेरी जोनास नावाची मुलगी आहे.प्रियांका व निक यांची लाडकी लेक मालती मेरी फक्त तीन वर्षांची आहे. ती प्रसिद्ध स्टार किड्सपैकी एक आहे. प्रियांका व निक कधीकधी तिचे फोटो किंवा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करतात.

# तर मी गुदमरून मेले असते: स्वरा भास्कर



अभिनेत्री स्वरा भास्कर ही तिच्या रोखठोक वक्तव्यांसाठी आणि तशाच प्रकारच्या खोचक पोस्टसाठी ओळखली जाते. अनेकदा तिला यासाठी ट्रोलिंगचाही सामना करावा लागला आहे. मात्र ट्रोलर्सची पर्वा न करता स्वरा भास्करने तिला जे वाटतं आहे ते कायमच व्यक्त केलं आहे. स्वरा भास्करने फहाद अहमदशी लग्न केलं. या दोघांना एक मुलगीही आहे. तिने मुस्लिम तरुणाशी लग्न केल्यानेही तिला ट्रोल व्हावं लागलं होतं. अशात स्वराने नुकतीच एक खास भूमिका मांडली आहे.समजा युद्ध झालं आणि माझ्यावर गोळी चालली, तर मी ती झेलायला तयार आहे. प्रत्यक्षात तुम्हाला गोळी लागते तेव्हा त्याचे परिणाम भोगावे लागतात. माझी मुलगी राबिया जन्माला यायची होती त्याआधी अभिनय हे माझं पहिलं प्रेम होतं. मला अभिनय करायला, वेगवेगळ्या भूमिका साकारायला खूप आवडत होतं. मला तितक्या संधी मिळाल्या नाहीत. मला वादग्रस्त अभिनेत्रीचा टॅग लागला. मला तो माझ्याच रोखठोक आणि बेधडक वक्तव्यांमुळे लागला याची मला कल्पना आहे.

# गुजरातच्या विजयासह हैदराबादचं पॅकअप!

## ‘गिल’सेनेची गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी झेप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या गुजरात टायटन्सने प्लेऑफच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकलं आहे. घरच्या मैदानावर झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने सनरायझर्स हैदराबादचा चांगलाच पाहुणचार केला. गुजरातने पहिल्या डावात फलंदाजी करताना हैदराबादसमोर २२५ धावांचे मोठे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना हैदराबादला अवघ्या १८६ धावा करता आल्या आहेत. गुजरात टायटन्सने हा सामना ३८ धावांनी आपल्या नावावर केला आहे.**






जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट स्टेडियमवर हैदराबादला विजय मिळवण्यासाठी मोठ्या आव्हानाचा पाठलाग करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना हैदराबादला चांगल्या सुरुवातीची गरज होती. हैदराबादकडून सलामीला फलंदाजी करताना हेड आणि अभिषेक शर्माने ४९ धावांची भागीदारी केली. हेड २० धावा करत तंबूत परतला. त्यानंतर ईशान किशन १७ चेंडूत १३ धावांची खेळी करत माघारी परतला. या डावात अभिषेक शर्माने सर्वाधिक ७४ धावांची खेळी केली. त्याने आपल्या खेळीदरम्यान ४ चौकार आणि ६ षटकार मारले. क्लासेनने या डावात २३ धावांची खेळी केली. शेवटी नितीश कुमार रेड्डी आणि पॅट कमिन्सने मिळून काही आकर्षक फटके मारले, पण ही जोडी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही.या सामन्यात हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून गुजरात टायटन्सला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. गुजरात टायटन्सकडून सलामीला आलेल्या शुभमन गिल आणि साई सुदर्शनने पुन्हा एकदा दमदार सुरूवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ८७ धावा जोडल्या. यादरम्यान साई सुदर्शनने २३ चेंडूत ४८ धावांची खेळी केली.

तर शुबमन गिलने ३८ चेंडूत ७६ धावांची खेळी केली. या दोघांनी पाया रचल्यानंतर शेवटी जोस बटलरने संघाची धावसंख्या २०० पार पोहोचवली. बटलरने ३७ चेंडूत ६४ धावा चोपल्या. वॉशिंग्टन सुंदरने २१ धावा केल्या. यासह गुजरातने २० षटकांअखेर २२४ धावांचा डोंगर उभारला.या सामन्यात गुजरात टायटन्सचा स्टार फलंदाज साई सुदर्शनने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. त्याने आयपीएल स्पर्धेत सचिन तेंडुलकरला मागे सोडलं आहे. या डावात फलंदाजी करताना साई सुदर्शनने २००० धावांचा पल्ला गाठला आहे. साई सुदर्शनने हा कारनामा ५४ व्या डावात करून दाखवला आहे. सचिन तेंडुलकरने हा कारनामा ५९ व्या डावात केला होता.आयपीएल २०२५ स्पर्धेतील ५१ वा सामना गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यातही गुजरात टायटन्सच्या सलामी जोडीने गुजरातला वादळी सुरुवात करून दिली. यादरम्यान साई सुदर्शनने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.गुजरात टायटन्सचा संघ गुणतालिकेत अग्रगण्य स्थानी असण्याचं प्रमुख कारण, त्यांची सलामी जोडी आहे. शुबमन गिल आणि साई सुदर्शनच्या जोडीने अनेकदा संघाला चांगली सुरुवात करून दिली. सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्धच्या सामन्यातही या जोडीने हैदराबादच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. दोघांनी पावरप्लेच्या षटकात ८२ धावा चोपल्या.या डावात फलंदाजी करताना साई सुदर्शनने दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

### सुदर्शनच्या 500 धावा पूर्ण

या डावात त्याने आयपीएलमध्ये २००० धावा करण्याचा कारनामा केला आहे. हा कारनामा त्याने ५४ व्या डावात करून दाखवला आहे. यासह सर्वात जलद २००० धावा पूर्ण करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. या यादीत शॉन मार्श अव्वल स्थानी आहे. त्याने हा कारनामा ५३ व्या डावात केला होता. तर सचिन तेंडुलकरने हा कारनामा ५९ व्या डावात केला होता. आता साई सुदर्शनने या रेकॉर्डमध्ये सचिनला मागे सोडलं आहे.आयपीएल २०२५ स्पर्धेत साई सुदर्शनच्या फलंदाजीची जादू पाहायला मिळाली आहे. हा युवा फलंदाज ऑरेंज कॅपच्या शर्यतीत विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव सारख्या अनुभवी फलंदाजांना तोडीस तोड टक्कर देत आहे. साई सुदर्शनने हैदराबादविरूद्धच्या सामन्यात ४८ धावांची खेळी केली. त्याचं अर्धशतक अवघ्या २ धावांनी हुकलं. यादरम्यान त्याने आयपीएल २०२५ स्पर्धेत ५०० धावांचा आकडा गाठला आहे.

# श्रीसंत संजू सॅमसनमुळे अडचणीत सापडला

## भारतीय संघाचा माजी गोलंदाज एस श्रीसंतवर तीन वर्षांची बंदी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचा माजी वेगवान गोलंदाज एस श्रीसंत अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. २००८ मध्ये झालेल्या आयपीएल स्पर्धेदरम्यान तो हरभजन सिंग सोबतच्या वादामुळे चर्चेत आला होता. त्यानंतर २०१३ मध्ये स्पॉट फिक्सिंग प्रकरणात दोषी आढळून आला. त्यामुळे त्याच्यावर बंदी घातली गेली होती. ही बंदी २०२० मध्ये संपली.**



त्यानंतर त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये कमबॅक केलं आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केलं. सध्या तो कुठल्याही प्रकारचं क्रिकेट खेळत नाही. मात्र तरीदेखील त्याच्यावर तीन वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. नेमकं प्रकरण काय? जाणून घ्या.एस श्रीसंत संजू सॅमसनमुळे अडचणीत सापडला आहे. फेब्रुवारी महिन्यात दुबईमध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेचा थरार रंगला. या स्पर्धेत भारतीय संघाने जेतेपदाला गवसणी घातली. या स्पर्धेसाठी संजू सॅमसनचा भारतीय संघात समावेश करण्यात आला नव्हता. त्यावेळी श्रीसंतने केरळ क्रिकेट असोसिएशनवर निशाणा साधला होता. श्रीसंतने केरळ क्रिकेट असोसिएशनबद्दल बोलताना अपमानजनक वक्तव्य केले होते. त्यामुळे केरळ क्रिकेट असोसिएशनने श्रीसंतवर कारवाई केली आहे.

हा निर्णय ३० एप्रिल रोजी कोचीमध्ये झालेल्या एका बैठकीत घेण्यात आला आहे.श्रीसंतने एकदा मल्याळम टीव्ही चॅनलवरील एका चर्चेत सहभाग घेतला होता. त्यावेळी त्याने वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यानंतर त्याला अलाप्पुझा टीम लीड, कोल्लम एरिज आणि अलाप्पुझा रिपल्स यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

श्रीसंत हा सध्या केरळ क्रिकेट लीग स्पर्धेत कोल्लम एरीज संघाचा सहमालक आहे. नोटीस बजावल्यानंतर तिन्ही संघांनी उत्तर दिली आहेत. त्यामुळे केरळ क्रिकेट असोसिएशनने त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही.यासह केरळ क्रिकेट असोसिएशनने श्रीसंतला नोटीस बजावण्यामागचं कारण देखील स्पष्टपणे सांगितलं आहे. श्रीसंतने संजू सॅमसनला पाठिंबा दिल्यामुळे ही कारवाई करण्यात आलेली नाही, तर त्याने केरळ क्रिकेट असोसिएशनविरूद्ध दिशाभूल करणारे वक्तव्य केले असल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

### एस श्रीसंतची क्रिकेट कारकिर्द

भारतीय संघाला २००७ टी-२० वर्ल्डकप आणि २०११ चा वनडे वर्ल्डकप जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. त्याच्या टी-२० क्रिकेटमधील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने १० सामन्यांमध्ये ७ गडी बाद केले आहेत. ५३ वनडे सामन्यांमध्ये गोलंदाजी करताना त्याने ७५ गडी बाद केले आहेत.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर ‘पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली’ कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

